पुढारी

# दात्री संस्थेच्या वतीने डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या कार्याचा सन्मान



**मुरुड : प्रतिनिधी**

डॉ.श्री.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिठान व दात्री (रक्तातील मूळ पेशी दात्यांची नोंदणी संस्था) यांच्या संयुक्त विद्यमाने ल्युकेमिया, लिंकोमा, थॅलेसेमिया, यासारख्या रक्त विकारांची जागृती व रक्तातील मूळ पेशींची नोंदणी शिबीर १६ जुलै २०१७ रोजी आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास ६ हजार ५०५ दात्यांची नोंदणी करण्यात आली. आतापर्यंतचे भारतातील हे सर्वात मोठे नोंदणी शिबिर होते. या सामाजिक कार्याची नोंद घेत दात्री संस्थेच्या जर्मनी येथील मुख्य सल्लागार क्लॉडिया रूट्ट, मुख्य कार्यकारी अधिकारी रघु राजगोपाल व सेथुकरासी एस. यांनी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिठानच्या कार्यालयात सन्मानपत्र प्रदान केले. यावेळी उमेशदादा धर्माधिकारी, सचिनदादा धर्माधिकारी व स्वरुपावहिनी धर्माधिकारी उपस्थित होते.